# प्रकरण पहिले

## विषय प्रवेश


1.1 विषय प्रवेश

1.2 संशोधन समस्येचे शब्दांकन

1.3 संशोधन समस्येचे महत्त्व व व्याप्ती

1.4 संशोधनाची उद्दिष्टे

1.5 गृहितके

1.6 संशोधनाच्या मर्यादा

1.7 संशोधन पध्दती

1.8 प्रकरणीकरण

संदर्भ

## १.१ विषय प्रवेश :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतापुढे अनेक बिकट समस्या उभ्या राहिल्या. त्या समस्यांचे स्वरुप ठोकळ मानाने सांगावयाचे झाल्यास राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक असे सांगता येईल. पण त्या सर्वांच्या मुळाशी खरी एकच समस्या आहे. ती म्हणजे भारतीय जीवनाच्या पुनर्रचनेची. भारतीतील वर्षानुवर्षे चालत आलेले धार्मिक, सामाजिक, आर्थिक जीवन गेल्या शंभर दीडशे वर्षात हळू हळू कोसळून पडले पूर्वीची घडी विस्कटली गेली. अनेक कल्पनांना तडे गेले. अनेक श्रध्दा ढासळल्या व त्यामुळे या श्रध्दा व कल्पना यांच्या आधारे चालत आलेले आचार लुप्त झाले. राजकारण, समाजकारण, अर्थकारण वा धर्मकारण कोणतेही क्षेत्र घ्या कोठेच स्थिरता नाही. परंपरा नाही अशी स्थिती झाली आहे. शिक्षण हा समाजकारणाचाच भाग तेथेही तेच. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोणती एकच एक समस्या उभी राहिली असेल तर ती समाजाची घडी नव्याने बसविण्याची, सामाजिक नवनिर्माणाची व पुनर्वसनाची. आणि हे कार्य केवळ थातुर-मातुर डागडुजीने, जुन्या नव्यांची काही सांधेजोड केल्याने होणार नाही. मुळाशी जाऊनच काही शाश्वत मूल्यांचा व तत्त्वांचा विचार केला पाहिजे; नवमूल्यांचा शोध घेतला पाहिजे; व ती तत्त्वे आचारात आणण्याची यंत्रणा उभारली पाहिजे.

शिक्षण क्षेत्राचा विचार सामाजिक, राजकिय व आर्थिक जीवनापासून अलग करता येत नसल्याने या पार्श्वभूमीचा मागोवा घ्यावयास लागतो. शिक्षणक्षेत्रात अभ्यासक्रम, व्यवस्थापन, अध्यापन व विद्यार्थ्यांचे चारित्र्य-संवर्धन या चारही प्रमुख अंगांविषयी आज असमाधान दिसत आहे. त्याचा संबंध वर उल्लेखिलेल्या दीडशे वर्षातील विविध घटनांशी आहे.

आज शालेय जीवनाचा व विद्यार्थी जीवनाचा विचार करताना सर्वांना चिंताग्रस्त करणारा व बुचकळ्यात टाकणारा जर कोणता प्रश्न असेल तर तो त्यांच्यातील संस्काराच्या अभावाचा. या संस्काराच्या अभावाने बेशिस्तीच्या प्रश्नाचे स्वरुप समाजातील घटकांना वेगवेगळ्या तऱ्हेने जाणवले. पालक व शिक्षक म्हणतील,

मुलांना नियमीतपणाच्या सवयी नाहीत, त्यांच्यात उद्योगीपणा नाही, वेळेवर शाळेत ती येत नाहीत; शाळेतच नव्हेतर घरीही घरच्या कामात, शाळेच्या कामात चालढकल; उलट उत्तरे देण्यात त्यांना काहीच वाटत नाही, त्यांचा कशावर विश्वास नाही; वाटेल त्यांची ती टिंगल करतात, हुल्लड माजवतात, रस्त्यात रोमिओगिरी करतात, त्यांच्यात सौजन्य नाही, सुसंस्कृतपणा नाही, आदरभाव नाही, जीवनाविषयी आस्था नाही; थोडक्यात उच्छृंखलपणा, अविचार, तुच्छता(सिनिसिझम) ही नव्या पिढीत वाढत आहे.१ समाजाच्याच नव्हे तर राष्ट्राच्या दृष्टीने ही एक गंभीर घटना आहे.

गेल्या शतकातील आमचे गृहजीवन खुपसे बदलले, कुटुंबसंस्था बदलली; कुटुंबातील आचार व श्रद्धा बदलल्या व लोपल्या. कुटुंबातच औदासीन्यामुळे वा नवविचारामुळे, नव्या पिढीला स्वातंत्र्य मिळाले. विशिष्ट सवयी लावण्याचे व श्रद्धा-विश्वास रूजविण्याचे कार्य होईनासे झाले. बालसंगोपन, मुलाचे चारित्र्यसंवर्धन याबाबतीत आपली जबाबदारी न जाणणारी, न ओळखणारी ,व समजून ती पेलण्याला असमर्थ असलेली नव्या तरूण तरूणींची एक कुटुंब संस्था अस्तित्वात आली, ज्या भावनावश संस्कारक्षम वयात काही घडवायचे, ते वय स्वच्छंदी अनिर्बंध व विपरीत संस्काराच्या वातावरणात जाऊ लागले. यातूनच 'चारित्र्याबाबत आणिबाणी' (क्रायासिस ऑफ कॅरेक्टर ) आज निर्माण झाली आहे. याबाबतीत शिक्षणसंस्थाच काहीतरी करू शकेल. शिक्षणापासून समाजाच्या तशा अपेक्षाही असतात. त्यातील नव्या पिढीच्या चारित्र्यनिर्मीतीची अपेक्षा ही सर्वात महत्वाची आहे.

प्राचीन काळापासून शिक्षणात चारित्र्य संवर्धन, शीलसंवर्धन यासारख्या मूल्यांचा विचार वेगवेगळ्या पातळीवर झालेला आहे. मानवाच्या जीवनाला मूल्यांचा पाया असतो आणि असावा. मानव प्राण्यांचे जे मानवात रूपांतर होत असते ते होण्यामध्ये शिक्षणाच्या म्हणजेच मूल्य निर्मीती करण्यांच्या प्रयत्नाचा फार मोठा वाटा आहे. या संदर्भात प्लेटो म्हणतो " आदर्श मानव बनविणे हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय असावे. सद्‌गुणांच्या जोपासनेतून माणूस आदर्श मानव बनतो. "२

सॉक्रेटिसने 'ज्ञान म्हणजे सद्‌गुण' ( Knowedge is Virtue ) ३ असे

म्हटले आहे. चारित्र्यसंवर्धन हे आध्यात्मिक व धार्मिक प्रवृतीच्या विकासाहून वेगळे नाही याचे प्रत्यंतर प्राचीन भारतीय संस्कृतीतून दिसून येते. ज्ञानपेक्षाही सद्‌गुणावर,सदाचारावर,नैतिक वागणूकीवर अधिक भर होता. 'शीलं परम् भुषणम' हा वागणूकीचा आदर्श होता. ' धर्म हि यो वर्धयते स पंडीतः 'म्हणजेच धर्मानुसार आचरण करणारा, शुद्धाचरणी व चारित्र्यसंपन्न माणूसच खरा ज्ञानी, असे महाभारत सांगते. विद्वत्ता असली तरी तिचा अंहकार नको ' विद्या विनयेन शोभते । ज्ञानेश्वर म्हणतात, ' थोरपण पऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ती आघवी विसरिजे । जै जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी ।। ' त्यामुळे नैतिक मूल्यांचे संस्कार करून चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे महत्वाचे उदिष्ट ठरते.४

वरील सर्व विवेचनावरून असे दिसून येते की , शिक्षण म्हणजे मूल्य निर्मीती करण्याचा प्रयत्न होय. परंतू आज सामाजिक संस्थाकडे पाहिल्यास आपणास असे दिसून येते की, शिक्षणाची जी आदर्श मूल्ये होती, आहेत, ती पायदळी तुडवून माणूस आपल्या सुखासाठी अवैध मार्गाचा अवलंब करीत आहे. केवळ सुख हाच त्यांचा जिवनाचा केंद्रबिंदू बनला आहे. ही स्थिती पाहून कवयित्री बहिणाबाई म्हणतात,

" अरे माणसा कधी व्हशील माणूस,
अरे माणसाचा झाला कानूस"

ही निराशा टाळावयाची असेल माणसातलं माणूसपण टिकवायचे असेल तर शिक्षणाने काहीं तरी नवनिर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रद्धांचा, मूल्यांचा झालेला ऱ्हास, त्यांची जिवनात निर्माण झालेली पोकळी नवीन श्रद्धांनी भरून काढली पाहिजे. तरच माणसाचा " माणूस " घडेल. व आदर्श मानवाची निर्मीती होऊन समाज व राष्ट्र आदर्श बनेल.

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. भिन्न-भिन्न धर्माचे लोक एकत्र राहतात. अशा परिस्थितीत भारतीय शाळांमधून धार्मिक मूल्यांचे शिक्षण द्यावयाचे का? कसे द्यावयाचे हा प्रश्न निर्माण होतो. म्हणून आपल्या देशात धार्मिक शिक्षण या संकल्पनेचा त्याग केला आहे. विविध धर्मामुळे धार्मिक शिक्षणावर बंधन आले आहे. धार्मिक शिक्षणाद्वारे होणारे नीतीमूल्य संस्काराचे, त-त्वांचे, आचरण आज

त्याज्य ठरले आहे. त्यामुळे आपली फार मोठी हानी झाली आहे, होत आहे.

रॉस, हा शिक्षणतज्ञ म्हणतो," जीवनातील श्रेयस काय याचे दर्शन घडविण्याचे व श्रेयस प्राप्तीसाठी प्रेरणा देण्याचे काम धर्मच करू शकतो." ५ पण हे आज होत नाही.

यूकेन म्हणतो, ' संपूर्ण जीवन हे धर्ममयच असले पाहिजे असे नाही तर धर्म हेच जीवन बनले पाहिजे .' ६

परंतु आज आपण धर्मनिरपेक्षतेचे (सेक्यूलर) तत्व स्विकारले आहे. मग अशा धर्मनिरपेक्ष समाज जीवनात धर्माचे स्थान काय? यावर डॉ राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्थापित झालेल्या शिक्षण आयोगाने (१९४८) काही उपयुक्त सूचना केल्या आहेत. श्रीप्रकाश,समितीने देखील धार्मिक शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादली आहे.

कोठारी आयोगाने, - " नैतिक व धार्मिक मूल्यांचे संस्कार " हे राष्ट्रीय शिक्षणाचे महत्वाचे उदिष्ट सांगितले आहे.७

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ' शैक्षणिक कार्यक्रमाकडून कृती कार्यक्रमाकडे ' यामध्ये पुढील विचार उदधृत केलेले आहेत.

८.४ आवश्यक मूल्यांच्या -हासाबाबत वाटती चिंता आणि समाजातील वाढत जाणारी उपहासवृत्ती यामूळे सामाजिक आणि नैतिक मूल्ये रूजविण्यास शिक्षण हे समर्थ साधन बनावे यासाठी अभ्यासक्रमाची पुन्हा नव्याने जुळणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

८.५ आपल्या सासंकृतिक दृष्ट्या बहुविध असणा-या समाजात सर्वसामान्य जनतेत ऐक्य व पूर्णत्व येण्यासाठी शिक्षणाने वैश्विक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन दिले पाहिजे. अशा मूल्याशिक्षणाने गुटवाद, धर्मवेड, हिंसा, लोकभ्रम, व दैववाद कमी करण्यास मदत केली पाहिजे.८

वरील उताऱ्यावरून शिक्षण हे मूल्यसंवर्धनाचे प्रमुख साधन आहे. ते व्यवस्थित जाण्यासाठी शिक्षणानेच फार मोठे सहाय्य होते. अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या विविध मानसिक शक्ती व प्रवृतींना योग्य वळण लावून त्यांच्यामध्ये

मूल्ये कशी रूजतील याची काळजी घेणे आज अगत्याचे बनले आहे.

मूल्यशिक्षणाच्या संदर्भात विविध शिक्षणतज्ञांनी मते मांडली आहेत.

शिपमन,- ' जेणेकरून व्यक्तींच्या वर्तनात बदल घडवून आणून तद्द्वारा एकंदर समाजामध्येही बदल घडून येईल या हेतूने जाणीवपूर्वक नियंत्रित केलेली प्रक्रिया म्हणजे शिक्षण.'९

कोमेनिअस, - ' खरी शाळा म्हणजे माणुसकीचा कारखाना असतो.'१०

प्लेटो, - ' मुलांच्या जन्मजात शक्तींना संस्कारित करून त्यांना अनुरूप अशा सद्‌गुणांचा विकास म्हणजे शिक्षण.' ११

स्वामी विवेकानंद, - ' शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविष्कार.' १२

रवींद्रनाथ टागोर, - ' खरे शिक्षण म्हणजे माणसा-माणसात संबंध प्रस्थापित करणे, प्रेम करणे, मानवतेचा विकास करणे, मानवातील एकतेचा साक्षात्कार घडविणे.'१३

महात्मा गांधी, - ' आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तिमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय.' १४

शिक्षणतज्ञांच्या वरील व्याख्येवरून मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी शिक्षण हे कसे प्रभावी साधन आहे हे लक्षात येईल. यासाठी अध्यापनाद्वारे मातृभाषा या विषयाच्या माध्यमातून जाणीवपूर्वक मूल्यांची जोपासना करणे अग-त्याचे आहे. यासाठी शिक्षण हे अत्यंत उपयुक्त व खात्रीलायक साधन आहे.

मानवी जीवनातील संस्कृतिनिर्माण ,संस्कृतिसंरक्षण, संस्कृतिसंवर्धन आणि संस्कृति- संक्रमण या कार्याला भाषा हीच साधनभूत ठरली आहे. सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीला भाषेच्या माध्यमातून मिळतो. मातृभाषा ही माणसाच्या विचारांना, भावनांना विशिष्ट प्रकारचे वळण लावून त्यांच्या सांस्कृतिक जीवनाची जडण-घडण करीत असते. म्हणजेच शिक्षणाचे,ज्ञानप्राप्तीचे, विद्यार्थ्यांच्या वा कोणत्याही व्यक्तीच्या शैक्षणिक विकासाचे माध्यम मातृभाषाच आहे.

मूल्यांचे महत्व लक्षात घेता, ती विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यासाठी

मातृभाषा मराठीची पाठ्यपुस्तके माध्यम म्हणून कशी वापरता येतील, मूल्य शिक्षणाचा विचार करून गद्य व पद्य पाठामधुन उत्तम संस्कार कसे करता येतील, प्रत्येक पाठामधून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत. कोणती नवीन मूल्ये शोधता येतील, मूल्य संक्रमणामध्ये कोणत्या अडचणी येतात. त्या अडचणी दूर करण्यासाठी कोणते उपाय योजता येतील, विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संवर्धनासाठी शिक्षकांचे प्रयत्न कोणते आहेत, त्यामध्ये नव्या उपक्रमाची भर घालून काही शिफारसी सुचविता येतील का? या संदर्भात एक शिक्षक ,प्रशिक्षक आणि शिक्षणशास्त्राचा एक विद्यार्थी म्हणून या विषयावर संशोधन करण्याची आवश्यकता भासते आहे.

**१.२ संशोधन समस्येचे शब्दांकन -**

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन पुढील प्रमाणे केले आहे.

" इयत्ता १ ली ते ४ थी च्या प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा चिकित्सक अभ्यास".

संशोधन हे एक शास्त्रीय कार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करताना संज्ञा एका विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. यासाठी तसेच संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधन समस्येच्या वरील विधानात वापरलेल्या महत्वाच्या संज्ञाच्या व्याख्या खालील प्रमाणे केल्या आहेत.

**इयत्ता १ ली ते ४ थी -**

महाराष्ट्र राज्यात १०+२+३ हा शिक्षणाचा आकृतिबंध राबवला जात आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६' नुसार पहिल्या टप्प्यात इयत्ता १ ली ते ५ वी निम्न प्राथमिक स्तर व इयत्ता ६ वी ते ८ वी उच्च प्राथमिक स्तर मान्य केला आहे. या निम्न प्राथमिक स्तरात येणा-या इयत्ता १ ते ४ थी पर्यंतच्या मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टीने विचार केला आहे.

**प्रथम भाषा मराठी -**

मराठी हा विषय ' प्रथम भाषा, द्वितीय भाषा व तृतीय भाषा

' या तीन स्तरावर शाळांमधून शिकवला जातो. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांची मराठी भाषा ही मातृभाषा आहे. त्यामुळे मराठी भाषा बहुतेक प्राथमिक शाळांमधून ' प्रथम भाषा ' म्हणून शिकवली जाते. प्रस्तुत संशोधनात ' प्रथम स्तरावर शिकविली जाणारी मराठी ' या अर्थाने शब्दप्रयोग केला आहे.

पाठ्यपुस्तके -

' पाठ्यपुस्तक ' या संज्ञेस ' क्रमिक पुस्तक ' असा पर्यायी शब्द दिला आहे त्याचा अर्थ इंग्रजी प्रतिशब्द ' Text-Book ' असा आहे. Text-Book चा अर्थ 'A Book For Regular Study '१५ असा आहे.

पाठ्यपुस्तकाची व्याख्या -

" Basic Book used in perticular course of study " १६ अशी केलेली आहे. त्याचा अर्थ विशिष्ट अभ्यासक्रमासाठी योजलेले मूलभूत पुस्तक असा होतो.

त्रिभाषा सुत्रानुसार मातृभाषेची प्रथम भाषा म्हणून शालेय अभ्यासक्रमांत नोंद झालेली आहे. महाराष्ट्रात प्रथम भाषा म्हणून मातृभाषा मराठी शिकविली जाते. मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकांचा विचार करताना येथे प्रथम भाषा म्हणून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी नियुक्त केलेली 'बालभारती' इयत्ता १ली, २री, ३री व ४थी, ही पाठ्यपुस्तके अभिप्रेत आहेत. त्यांचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात विचार केला आहे.

मूल्यशिक्षण -

मूल्य या शब्दाला इंग्रजीमध्ये Value असा प्रतिशब्द आहे. या संज्ञेचा अर्थ खालीलप्रमाणे आहे.

Belief about what is desirable or undesirable , values reflect the culture of society and if the individual accepts a value for him/herself it may become a goal. १७

येथे ' मूल्यशिक्षण ' हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडित आहे. मानवी जीवनाला ज्यामुळे महत्व प्राप्त होते अशी सांस्कृतिक,

समाजमान्य परंपरागतदृष्ट्या आलेली जी तत्वे त्यांना ' मूल्य ' असे संबोधतात. शिक्षणप्रक्रियेची जी विविध उद्दिष्टे आहेत त्यामध्ये या विविध मूल्यांचा संस्कार करणे, ती संक्रमित करणे हे एक महत्वाचे उद्दिष्ट मानले जाते. भारतीय समाजाने मानवी जीवनाला महत्व प्राप्त करून देणारी अशी जी मूल्ये मानली आहेत ती मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये परिणत करणे अशा अर्थी ' मूल्यशिक्षण ' हा शब्द वापरला आहे.

मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकांतील व्यक्त होणा-या विविध मूल्यांचा शोध घेण्याचा विचार आहे. त्या संदर्भातील समस्यांचा शोध व समस्येवरील उपाययोजना यांची नोंद या शोध प्रबंधात करावयाची आहे.

<u>चिकित्सात्मक अभ्यास -</u>

या संदर्भात चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग, सविस्तर, तपशीलवार, समीक्षात्मक अभ्यास होय.

' चिकित्सा ' या संज्ञेत समस्येचे सखोल निरीक्षण व विश्लेषण अपेक्षित आहे.

**<u>१.३ संशोधन समस्येचे महत्व व व्याप्ती -</u>**

सामाजिक क्षेत्रामध्ये होत असलेला मूल्यांचा -हास या समस्येच्या संशोधनासाठी कारण ठरलेला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून पंचेचाळीस वर्षे झाली. भारतातील लोकांच्या सामाजिक, आर्थिक, मानसिक परिस्थितीकडे पाहिले की, प्रत्येक ठिकाणी संस्कृतीला पोषक असणा-या मूल्यांचा होत असलेला -हास पहावयास मिळतो. स्वतःची कर्तव्यदक्षता विसरून स्वार्थासाठी भ्रष्टाचारी बनलेली पिढी आपण पहात आहोत. चिरंतन सत्याला सामोरी जाण्यासाठी आवश्यक असणारी निर्भयता क्वचितच एखाद्याकडे पहावयास मिळते. त्यामूळे सर्वत्र अपप्रवृतीचे साम्राज्य पहावयास मिळते आहे. त्यामुळे राष्ट्रीय, सामाजिक स्वास्थ्याला ग्रहण लागले आहे जीवनात येत असलेले यश-अपयश हे खिलाडुवृत्तीने झेलले पाहिजे, पचविले पाहिजे. पण प्रत्यक्षात यशाने हुरळून जाऊन यशाच्या धुंदीमध्ये ' स्व ' चा नाश करणारी आणि अपयशाने क्रोधीत होऊन इतरांचा नाश करणारी आजची पिढी तयार झाल्याचे

आपण पाहतो. वैज्ञानिक दृष्टिकोनाला सामोरे न जाता स्वार्थासाठी आंधळ्या धर्मांची कास धरणारे व माणुसकी हरवलेले अनेकजण आपणास पहावयास मिळतात.

भारतीय संविधानात चार मुलभूत मूल्यांची प्रांरभीच निर्देश करण्यात आला आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणा ही ती चार मूल्ये होत. यात न्याय हे अग्रभागी आहे. या चार मूल्यांच्या आधारावर हा देश एक बलदंड व संपन्न बनेल अशी आपली अपेक्षा होती, पण आज वस्तुस्थिती काय आहे. पंजाब प्रश्न, सीमावाद, जातीय दंगली, भ्रष्टाचार, धर्मवेडेपणा या सा-या गोष्टी आपली मूल्ये पायदळी तुडविल्याचे स्पष्ट करतात. म्हणून करूणा, सहकार्य, बंधुता, समता, आदरभाव, राष्ट्रीय एकात्मता, निसर्गप्रेम, आप्तप्रेम, देशप्रेम, विज्ञानदृष्टी, शूरता यासारखी मूल्ये भारतीयांमध्ये रूजविण्याची गरज निर्माण झाली आहे.

वैज्ञानिक प्रगतीबरोबर समाजजीवनातील अनेक श्रद्धा व तत्वांचा ऱ्हास होत आहे. व त्यामुळे सांस्कृतिक जीवनामध्ये पोकळी निर्माण होत आहे. ती भरून काढण्यासाठी, नवनिर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रसिद्ध अस्तित्ववादी तत्ववेत्ता - फ्रेड्रिक नित्शे (१८४४-१९००) म्हणतो, " परमेश्वराचा अंत झाला आहे आणि आता नीतीविषयक मूल्यांचा आधार नाहीसा झाला आहे. मनुष्य हा मूल्याशिवाय जीवन जगूच शकत नाही. त्यासाठी आपल्या जीवनाला आधार देणारी नवीन मूल्ये शोधून काढली पाहिजेत. " परमेश्वराचा अंत झाला म्हणजे, श्रद्धांचा अंत झाला श्रद्धेवर आधारित धर्म, धर्मावर आधारित परमेश्वर, परमेश्वरावर आधारित मानवी जीवन मूल्ये यांचा अंत झाला. श्रद्धेला जीवनात स्थान उरत नाही, तेव्हा मानवाची अवस्था फार कठीण होते. कारण विविध प्रकारच्या श्रद्धांच्या आधारावर मानवी जीवनाचा डोलारा उभारलेला असतो. हा डोलारा कोसळून पडणे ही न टाळता येणारी घटना आहे.१८

नवीन मूल्ये निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण मनुष्य मूल्याशिवाय जगू शकत नाही. जुनी मूल्ये नष्ट होणार त्यामुळे पोकळी निर्माण होणार या भयावह अवस्थेत " मानवी डोळ्यांनी अजूनपर्यंत पाहिली

नसतील, अशी भयानक संहारक युद्धे पृथ्वितलावर घडतील, वैफल्यापोटी, मानसिक उद्योगापोटी, माणूस काहीही करील आणि जीवनातील पोकळी भरून काढील. अर्थहीन, अगांतुक, मूल्यहिन जीवन जगण्यापेक्षा स्वतःचा विनाशसुद्धा मनुष्य करून घेण्यास मागेपुढे पाहणार नाही.

ही भयावह परिस्थिती सावरण्यासाठी लोकामध्ये मूल्य संवर्धन व संक्रमण विशिष्ट नियोजनाद्वारे झाले पाहिजे. अशा भूमिकेतून या समस्येकडे संशोधक पहात आहे.

या संशोधन प्रकल्पामध्ये मूल्य संवर्धन व संक्रमण केवळ शिक्षणानेच शक्य आहे याचा विचार केलेला आहे. असा विचार करताना, शिक्षणानेच मूल्यसंवर्धन व संक्रमण शक्य आहे. याची निश्चिती झाल्यानंतर संशोधकाने मातृभाषेच्या क्रमिक पुस्तकाच्या अध्यापनाचाच मूल्य विचारांच्या संदर्भात विचार केला आहे. कारण,

" व्यक्तित्वाच्या वेलीवर उमलणा-या सुंदर सुमनांना मातृभाषा हाच जीवनरस आहे." १२

" मराठी मातृभाषेने महाराष्ट्रीय माणसाचे मन घडविले आहे. त्याच्या मनाच्या प्रत्येक पैलूवर मातृभाषेचे ऋण आहे. मातृभाषा ही संस्कृती संवर्धक असते. व्यक्तीमत्वामध्ये भावना परिपोष करून त्याला माणूसपण देणारी मातृभाषा ही जीवनदायी असते. तिच्यातून व्यक्त होणारा विचार व्यक्तिमत्वात सहजतेने बिंबतो. व्यक्तिच्या विकासाला मातृभाषा कारण ठरू शकते. म्हणून मातृभाषा हे एक व्यक्तिमत्वाच्या विकासाचे श्रेष्ठ साधन आहे." म्हणून मूल्य विचारांच्या संदर्भात मातृभाषेचाच क्रमिक पुस्तकांचाच विचार संशोधकाने केला आहे.

शोध समस्येमध्ये इयत्ता १ली ते ४थी च्या वर्गातील म्हणजे निम्न प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या संदर्भात विचार करावयाचा आहे. या स्तरावर ६ + ते १०+ या वयोगटाची मुले येतात. व हे वय संस्कारक्षम असते, अनुकरणशिल असते. या वयात त्यांना आपण घडवू तशी ती घडतात. याच वयात

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

व्यक्तिमत्वाच्या विकासाचा पाया घातला जातो. व या पायावरच भावी जीवन उभारले जाते.

या वयोगटातील बालक समाजातून कुटुंबातून शाळेत येत असते. शालेय व कौटुंबिक परिस्थिती त्याच्यावर सतत आघात करत असते. असे अनेक घटक असतात की त्यातून त्याची जडण-घडण होत असते. या जडण-घडणेला योग्य वळण, आकार, संस्कार, शालेय चौकटीतून करण्याची आवश्यकता असते. अशा योग्य संस्कारबध्द जीवनाची बांधणी शाळेने जर केली तर त्या मुलांच्या भावी जीवनाला खरा अर्थ प्राप्त होईल.सुसंस्कृत व्यक्तिमत्व त्यांच्यातून निर्माण करता येईल.

मूल्यांचा होणारा -हास, मातृभाषेचे मूल्य शिक्षणामधील महत्व आणि ६+ ते + १० या वयोगटातील मुलांची वैशिष्टये लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधन विषयाचे स्वरूप पाहिले आहे.

संशोधन समस्येचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल -

या संशोधनाचे निष्कर्ष व त्यावर आधारित शिफारसी मूल्यशिक्षणसंदर्भातील प्रचिलित परिस्थितीतील समस्यांच्या निकरणासाठी उपयुक्त ठरतील असा विश्वास वाटतो.

मूल्य शिक्षणाला मानवी जीवनात महत्वाचे स्थान आहे. परंतु आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये आजपर्यंत मूल्यशिक्षणाकडे दुर्लक्ष केले गेले आहे.

शिक्षण प्रक्रियेमध्ये दुर्लक्षित झालेल्या ह्या घटकाकडे अध्यापक, पालक, शैक्षणिक संस्था-चालक व सरकार यांचे लक्ष वेधण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन उपयुक्त होईल याची खात्री वाटते.

कोणतेही राष्ट्र केवळ भूभाग, जमीन, दगड, माती नव्हे, राष्ट्र म्हणजे राष्ट्रातील माणसे होत. माणसे घडवून, आपल्याला राष्ट्र घडवायचे असते. कोणतेही राष्ट्र मूल्यांचा पाठपुरावा केल्याशिवाय विश्वामध्ये खंबीरपणे उभे राहू शकत नाही. 'क्रियाशीलता ' या मूल्याच्या पाठपुराव्यामुळे अमेरिका, जपान, जर्मनी, रशिया आज जगामध्ये ताठ मानेने जगताहेत. मूल्यांचा पाठपुरावा हा राष्ट्रउभारणीसाठी

आवश्यक असते. याची जाणीवजागृती समाजामध्ये घडविण्याच्या दृष्टीनेही प्रस्तुत संशोधन उपयुक्त होईल याची खात्री वाटते.

मूल्यशिक्षणातील अडचणी नाहीशा करण्यासाठी अध्यापकांनी मराठीच्या पुस्तकाच्या अध्ययन, अध्यापनाबाबतीत कोणती सुधारणा केली पाहिजे या संदर्भात प्रस्तुत संशोधनावरील निष्कर्ष व शिफारसी उपयुक्त होतील.

' मूल्य ' ही संज्ञा व्यापक आहे. पण सर्वच मूल्य संक्रमणाचा विचार येथे अभिप्रेत धरलेला नाही. केवळ इयत्ता १ली ते ४थीच्या प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संक्रमणाचाच विचार येथे केलेला आहे. त्यासाठी मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनापुरताच हा अभ्यास मर्यादित आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे -

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) इयत्ता १ली ते ४थी च्या स्तरावरील प्रथम भाषा ( मातृभाषा ) मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून व्यक्त होणा-या मूल्यांचा शोध घेणे.

२) पाठामधून व्यक्त होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होण्यासाठी मराठीचे शिक्षक कोणते प्रयत्न करतात याचा शोध घेणे.

३) पाठात नोंद झालेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्या मागील कारणांचा शोध घेणे.

४) ही मूल्ये अधिक चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांमध्ये बिंबवण्यासाठी कोणते प्रयत्न करावयाचे, कोणते उपक्रम हाती घ्यावयाचे या संदर्भात उपाय योजना सूचविणे.


वाळवा तालुका
कृष्णानदी
इस्लामपूर
आष्टा
वारणा नदी
वाळवा तालुका
सांगली जिल्हा
भारत
सांगली जिल्हा
N
Kms.
स्केल

**१.५ गृहितके-**

प्रस्तुत संशोधन करताना पुढील गोष्टी गृहीत धरल्या आहेत.

१) मानवी जीवनात मूल्यांचे अनन्य साधारण स्थान आहे.

२) मूल्य संस्कारामुळे माणसाला माणुसपण प्राप्त होते.

३) शिक्षण हे विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे महत्वाचे साधन आहे.

४) मातृभाषा तिचे अध्यापन हे संस्कार करण्याचे मह-त्वाचे साधन आहे , तसेच मातृभाषेतून मूल्य संक्रमण सहजतेने होऊ शकते.

५) ६+ ते १० + हा वयोगट संस्कार करण्याचा पाया आहे.

**१.६ संशोधनाच्या मर्यादा -**

या संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) हे संशोधन इयत्ता १ ली ते ४थी प्रथम भाषा मराठी या विषयाच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्ययनापुरतेच मर्यादित आहे.

२) हे संशोधन वाळवा तालुका (जिल्हा सांगली) पुरतेच मर्यादित आहे.(पाहा पान नं. १४ )

३) हे संशोधन इयत्ता १ ली ते ४ थी या वर्गाच्या मराठी माध्यामाच्या शाळा पुरतेच मर्यादित आहे.

**१.७ संशोधन पद्धती -**

हे संशोधन वर्तमानकालीन समस्येशी निगडित असल्या या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. या समस्येच्या संदर्भात सद्यःस्थिती कोणती आहे हे जाणून घेण्यासाठी ही संशोधन पद्धती उपयोगी ठरली. त्यामुळे या पद्धतीच्या आधारे मिळालेल्या व पाठ्यपुस्तकांच्या परिक्षण, विश्लेषणातून मिळालेल्या माहितीचे संकलन, वर्णन व स्पष्टीकरण करून त्या अनुषंगाने मूल्यशिक्षणासाठी अपेक्षित असणा-या बदलासाठी योग्य त्या शिफारसी केलेल्या आहेत.

या संशोधनासाठी लागणारी सामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण या साधनांचा वापर करण्यात आला.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रस्तुत संशोधन खालील तीन भागात केले आहे.

१) इयत्ता १ ली ते ४ थी प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा शोध घेणे.

२) पाठ्यपुस्तकातून मूल्ये संक्रमीत होतात काय, जर होत असतील तर शिक्षक कोणते प्रयत्न करतात याचा अभ्यास करून ती किती प्रमाणात संक्रमित होतात याचा शोध घेणे.

३) मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्या कारणांचा शोध घेऊन मूल्य संक्रमणासाठी आवश्यक ते उपाय सुचविणे व शिफारसी करणे.

**प्रश्नावली -**

संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करण्यासाठी इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठी विषय शिकवणा-या शिक्षकांसाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे. प्रश्नावली मूल्यशिक्षण-संवर्धन, संक्रमण तसेच इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठी पाठ्यपुस्तकातून प्रतित होणा-या मूल्यांच्या शोधनावर आधारीत आहे. तसेच पाठ्यपुस्तकातून प्रतित होणा-या मूल्यांच्या रूजवणीकरणासंदर्भात मराठीचे शिक्षक कोणकोणते प्रयत्न करतात, त्यांच्या प्रयत्नामध्ये अडचणी कोणकोणत्या यावर आधारीत आहे. तसेच या प्रश्नावलीच्या आधारे मूल्यशिक्षण, मातृभाषेची पाठ्यपुस्तके, त्यामध्ये प्रतिबिंबित होणारी मूल्ये यांच्या संदर्भातील शिक्षकांचे मनोगत, त्यांची मते, विचार व अपेक्षा यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मुलाखत -**

इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गांना मराठी शिकवणा-या शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. (परिशिष्ट क्र. 'ड' ) त्यातून शिक्षकांच्या अनुभवांचा व सुचनांचाही खूप लाभ झाला.

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांशी समस्येच्या संदर्भात चर्चा करून

मूल्यशिक्षण संदर्भात पालकांचा सहभाग कसा असावा, कोणते सहकार्य अपेक्षित आहे, कोणत्या अडचणी आहेत. व मूल्यसंक्रमण होण्याच्या दृष्टीने पालकांच्या अपेक्षा कोणत्या आहेत याचा शोध घेतला आहे.

**प्रत्यक्ष भेटी व पाठ निरीक्षणे -**

संशोधकाने इयत्ता १ ली ते ४ थी च्या शाळांना भेटी दिल्या व मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाच्या संदर्भात २० पाठांचे निरीक्षण केले. हे पाठांचे निरीक्षण मराठीचे अध्यापक मूल्य रूजविण्यासाठी काही विशेष प्रयत्न करतात का? करत असल्यास त्या प्रयत्नांचे स्वरूप कोणते? या संदर्भात होते. पाठ निरीक्षण केलेल्या अध्यापकांची नावे परिशिष्ट क्र.'इ' मध्ये दिलेली आहेत.

वरील साधनांच्या द्वारे जी माहिती गोळा केली तिची वेळोवेळी नोंद ठेवली. त्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण करून योग्य मांडणी केल्याने वस्तुस्थितीची स्पष्ट कल्पना आली. वस्तुस्थितीचा अभ्यास करून अपेक्षित स्थितीच्या संदर्भात या वस्तुस्थितीचे स्वरूप लक्षात घेतले. या समस्येशी संबधीत बाबींचे निरीक्षण करून समस्येचे निश्चित स्वरूप मांडण्यात आले. व प्राप्त माहितीच्या आधारे योग्य ते निष्कर्ष काढण्यात आले. या सर्व निष्कर्षांचा एकत्र व सुत्रबद्ध विचार करून प्रस्तुत समस्येच्या संदर्भात कोणती उपाययोजना करणे आवश्यक व शक्य आहे ते स्पष्ट केले.

**१.८ प्रकरणीकरण -**

वरील प्रमाणे गोळा केलेल्या माहितीचे खाली निर्देश केल्याप्रमाणे सहा प्रकरणात विभाजन करण्यात आले.

**प्रकरण - एक :-संशोधन विषय प्रवेश -**

या प्रकरणामध्ये ही समस्या कशी निर्माण झाली त्याचा शोध घेऊन समस्येचे शब्दांकन केले. संशोधन विषयाचे महत्त्व, व्याप्ती, मर्यादा, स्पष्ट केल्या; त्याचप्रमाणे समस्येची उद्दिष्टे आणि समस्येच्या सोडवणुकीसाठी कोणती

संशोधन पद्धती उपयोगात आणली हे ही नमूद केले आहे. थोडक्यात सदर संशोधन समस्येचा वाचकाला परिचय करून दिलेला आहे.

**प्रकरण - दोन :- मूल्य - अर्थ महत्त्व व अध्यापन**

प्रस्तुत प्रकरणात मूल्य म्हणजे काय? त्यांचे मानवी जीवनातील स्थान, मूल्यांचे संक्रमण म्हणजे काय? ती कशी बिंबवायची म्हणजे काय करावयाचे? मूल्य शिक्षणात शिक्षकांची भूमिका कोणती ? इत्यादी गोष्टींचा ऊहापोह करण्यात आलेला आहे.

**प्रकरण - तीन :- संशोधन समस्येशी संबधीत साहित्याचे समालोचन -**

समस्येशी संबधित ग्रंथ व लेखरूपाने प्रकाशित साहित्याचे व संशोधीत साहित्याचे साहित्याचे समालोचन या प्रकरणात केले आहे.

**प्रकरण- चार :- इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या ' बालभारती ' या पाठ्यपुस्तकातील प्रतिबिंबीत पाठामधून ५ होणा-या मूल्याचे विश्लेषण -**

या प्रकरणामध्ये इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठीच्या पाठ्यपुस्तकाचे मूल्याच्या दृष्टीने विश्लेषण करून कोणती मूल्ये आढळतात याचा शोध घेतला आहे. तसेच ' मूल्य ' हा आधार मानून ती मूल्ये कोणकोणत्या पाठातून प्रतिबिंबित झालेली आहेत त्याचा शोध घेऊन ती निश्चीत करण्यात आलेली आहेत. तसेच त्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**प्रकरण - पाचवे - संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन -**

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रश्नावली, मुलाखत आणि पाठनिरीक्षण यांच्या आधारे गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करून या विश्लेषणावर आधारीत अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे.

**प्रकरण - सहावे - निष्कर्ष आणि शिफारसी -**

संशोधन सामुग्रीच्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत. काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे शिफारशींचा निर्देश करण्यात आलेला आहे. व निश्चित अशी उपाययोजना

सुचविण्यात आलेली आहे. तसेच प्रस्तूत संशोधन विषयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेल्या तथापि उपयुक्त ठरणा-या समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश करण्यात आलेला आहे.

## संदर्भ सूची –

१) मराठे, मा..स.,(संपादक), शैक्षणिक नवे विचारप्रवाह ,( सांगली : सहकारी श्रमिक मुद्रक प्रकाशक लि.)१९६४, पृ. १२९ –१३०

२) अत्तार, ए.डी., थोर शैक्षणिक तत्ववेत्ते ,(सातारा: रविल पब्लिकेशन), १९७७ पृ.८

३) ते ६) कुंडले, म.बा., शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र(पुणे, : श्री. विद्या प्रकाशन), १९७४, पृ.५६,१९८,१९९.

७) कोठारी,डी . एस, अध्यक्ष शिक्षण आयोग अहवाल ,शिक्षण आणि राष्ट्रीय विकास,(नवी दिल्ली,:शिक्षण मंत्रालय भारत सरकार )१९६४/६६

८) नागपुरे, व.रा./ संचालक,(म.रा.शै.सं. व प्रशिक्षण परिषद,): राष्ट्रिय शैक्षाणिक धोरण १९८६. शैक्षणिक आव्हानाकडे कृति कार्यक्रमाकडे,(पुणे : सर्वोदय मुद्रणालय), १९८७ पृ.१४४

९) शिपमन एम.डी.,: एज्युकेशन ॲन्ड मॉडर्नाझेशन, पृ.२६५

१०) १०,)११,)१२,)१३,)१४) कुंडले, म.बा., शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक, समाजशास्त्र, (पुणे:श्री.विद्या प्रकाशन), १९७४, पृ.५००, ५१०, ५७०, ५८०, ५८९.

१५) Page, G.T., and Thomas J. B. with Marshall A.R., International Dictionary of Education (London : The English Language book society and Kogan Page), १९७९, Page ३४२.

१६) Sykes, J .B., The Concise Oxford Dictonary of Current English., (Bombay: Oxford University Press. Seventh Edition), १९८७, P.११०७.

१७) Page G.T. and Thomas, J.B., with Marshall, A.R., International Dictonary of Education, (London: Kog

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

Page Ltd.) १९७८, P.३४२.

१८) मनोहर रवींद्र, <u>अस्तित्ववाद</u>, (औरंगाबाद : म.रा. ग्रंथ निर्मिती,मंडळासाठी भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.), १९७९ पृ. ७२, ७४.

१९) अकोलकर, ग.वि., पाटणकर,ना. वि., <u>मराठीचे अध्यापन</u>, (पुणे : व्हीनस प्रकाशन सातवी आ.), १९७०, पृ. ४.